भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये मा. दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार वाढीव मोबदला वाटपाची प्रकरणे तसेच लोक अदालतीमध्ये तडजोड झालेली प्रकरणे यामध्ये मोबदला वाटपासाठी प्राथम्य क्रम निश्चित करणेबाबत व त्यानुसार तयार केलेल्या यादीचे संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१७/PIL-३४/प्र.क्र.१०४/भाग-१/अ-४.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ०३ एप्रिल, २०१८

<u>वाचा</u> :- महसूल व वन विभागाचे समक्रमांकाचे संकेतांक क्रमांक २०१८०२२८१७१६१९७३१९, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ चे शासन परिपत्रक.

<u>प्रस्तावना :-</u>

मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.३४/२०१७ मध्ये मा. न्यायालयाने दि.११ सप्टेंबर,२०१७ रोजी दिलेल्या आदेशामध्ये संबंधित भूसंपादन अधिकारी हे भूसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत कलम १८ खालील दावे मा.जिल्हा / दिवाणी न्यायालयात कायद्यातील तरतूदीनुसार विहित कालावधीत दाखल न करता त्यासाठी अवाजवी विलंब केला जातो, तसेच दावेदार यांनी दाखल केलेल्या दाव्यातील रकमेचे वाटप मनमानी पध्दतीने केले जाते. त्यासाठी कोणत्याही विशिष्ट कार्यपध्दतीचा अवलंब केला जात नाही. असे ही मा. न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे. सदर जनहित याचिकेच्या दिनांक १.०३.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीदम्यान भूसंपादन प्रक्रिया व मोबदला वाटप प्रकिया याबाबत उहापोह झाला. त्या अनुषंगाने सर्वंकष विचार करुन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे सुधारीत आदेश देण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक :-

भूसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत कलम १८ खालील दाव्यांचा मा.जिल्हा / दिवाणी न्यायालयात निर्णय झाल्यावर दावेदार यांनी दाखल केलेल्या दाव्यातील रक्कमा वाटप करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. सर्वप्रथम भूसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये निवाडा घोषित केल्याचा दिनांक व तद्नंतर मा. दिवाणी न्यायालयात दाखल झालेल्या दाव्यांच्या निकालाचा दिनांक या दोन दिनांकानुसार प्राथम्यक्रम तयार करावा तसेच, लोक अदालतीमध्ये तडजोड झालेल्या प्रकरणांमध्ये निधी उपलब्ध करून देणेबाबतची प्राथम्य यादी लोक अदालतीमध्ये तडजोड झालेल्या दिनांकानुसार करण्यात यावी. व त्यानुसार निधीचे वाटप काटेकोरपणे करण्यात यावे. भूसंपादन संस्थेनिहाय तयार केलेली यादी संबंधित जिल्ह्याचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

त्यानुसार संबंधीत भूसंपादन अधिकारी यांनी काटेकोरपणे दक्षता घेऊन कार्यवाही करावी. यामध्ये अनियमितता आढळून आल्यास संबंधित अधिका-यांवर महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ नुसार त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

तरी सर्व जिल्हाधिकारी यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिनस्त सर्व भूसंपादन अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्याची कार्यवाही विनाविलंब करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०४०३१६३१४७४११९ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Asha Shailesh Dahake

Digitally signed by Asha Shailesh Dahake
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bdc3a70507686db48462c677bbbc5032947f8b7f5be3fb7ff1eaf137f7771f4b, cn=Asha Shailesh Dahake
Date: 2018.04.03 16:32:49 +05'30'

(आशा डहाके)

सहायक संचालक नगर रचना तथा अवर सचिव

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
२) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री (वित्त व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव , मंत्रालय, मुंबई
७) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८) सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सर्व विभागीय आयुक्त
१०) सर्व जिल्हाधिकारी
११) सर्व जिल्हा सरकारी वकील
१२) निवडनस्ती (अ-४)
१३) कार्यासन अ-१, अ-२, अ-३, अ-४.